
Dr. Nisha Bhandare

(पृष्ठ क्र. 78)

# लोकश्री



## रा. ना. चव्हाण विशेष

२०१६

# लोकभूमी


संस्थापक-संपादक : कै. नारायण देसाई

**नोव्हेंबर-डिसेंबर २०१६ (दिवाळी)**

**- रा. ना. चव्हाण जन्मशताब्दी विशेष**





| वर्ष : ३० वे | अंक : ०३ | किंमत : रुपये ५० |
| --- | --- | --- |



संपादक : कॉ. रमेश कोलवाळकर

संपादक मंडळ : श्री. प्रकाश मुचंडी, गोवा.

: कॉ. कृष्णा शहापूरकर, बेळगांव.

: डॉ. रामकृष्ण आंबिये, मुंबई.

: कॉ. चंद्रशेखर पाटील, बेळगांव.

: कॉ. बाळ देसाई, मुंबई.

: ॲड. अमृत कांसार, गोवा.

: डॉ. सुरेश नगर्सेकर, मुंबई.

: श्री. कुलदीप अ. कामत, गोवा.

: कॉ. सुरेश टिळेकर, पुणे

मार्गदर्शक : श्री. रमेश रा. चव्हाण, पुणे



मुद्रक, प्रकाशक : रमेश कोलवाळकर

कार्यालय : रोशन मंझील, तिसरा मजला,
सिने नॅशनलजवळ,
पणजी-गोवा.

☎ : (R) ०८३२- २२५१३५८
(M) ९७६३८१७२३९

मुद्रण स्थळ : रवी ऑफसेट,
१९१०, कडोलकर गल्ली, बेळगांव.

☎ : ०८३१-४२१३३१२,
९३४१७१८७२१

अक्षर जुळणी : हेरंब वाटवे, म्हापसा-गोवा.
: सतिश हावळ, बेळगांव.
मोबाईल- ०९३४३५६४५३३

मुद्रित तपासणीस : मंदाकिनी नारळीकर
सुहासिनी कोलवाळकर

मुखपृष्ठ : वैष्णव ग्राफीक्स, बेळगांव.
मोबाईल- ०९३४३५६४५३३



(अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही)

# धर्मविषयक चिंतन

रा– राजकारणाचे गाढे अभ्यासक, समीक्षक
म – मन समुद्राप्रमाणे विशाल, अथांग
चं– चंद्राप्रमाणे शांत, शीतल
द्र – द्रव्याचा हव्यास कधीही नाही.
च – चमकणारे कर्तृत्व असय आपले
व्हा – व्हावयाचे तुम्हापरी ठरविले माझ्या मनाने
ण – नशाच तुम्हां चिंतन, मनन, लेखनाची अहोरात्री.
यात सगळ्यात साथ दिली सहचारिणी इंदिराबाईनी.
जन्मशताब्दी वर्षानिमित्त तुमचा वसा घ्यावा नव्या पिढीने

असे म्हणूनी आपले धर्मविषयीचे विचार मांडणे हेच मी समजते कर्तव्य माझे.

रा. ना. चव्हाण या व्यक्तिमत्त्वाचा जन्म १० ऑक्टोबर १९९३ रोजी झाला. पुढील आयुष्य कृष्णामाईच्या संपन्न साक्षीने फुलले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, महर्षी वि. रा. शिंदे यांच्या सान्निध्यात असामान्य व्यक्तिमत्त्व घडले. वाचनातून चिंतन, चिंतनातून मनन, मननातून लेखन अशा मुशीतूनच बळकट घडणीतून त्यांच्यातील समाजप्रबोधनकार तयार झाला. सामाजिक ऐक्याच्या प्रबोधनासाठी साहित्यनिर्मितीला आपले *जीवन समर्पित* केले. असा हा साहित्याचा झरा वाहातच राहिला. शेवटच्या श्वासापर्यंत या अखंड झऱ्याचे पाणी म्हणजे सत्यशोधक चळवळ, ब्राह्मोसमाज, प्रार्थनासमाज, ब्राह्मणेतर वाद, बहुजनवाद, सामाजिक चिंतन, राजकीय विचार, धर्मविषयक स्वत:चे ठाम विचार याचबरोबर ज्या महान विचारवंत, समाजसुधारकांकडून प्रेरणा घेतली याविषयी आदराने अभ्यासपूर्ण विचार मांडले. म. फुले, राजर्षि शाहू महाराज, महर्षि वि. रा. शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी अशा विचारांचा हा झरा म्हणजे एकूण १२०० ते १३०० लेख, विविध दैनंदिन वृत्तपत्रे, मासिके, पाक्षिके, जसे 'दीनबंधू', 'राष्ट्रवीर', 'शिवनेरी' इ. प्रसारमाध्यमांमधून प्रसिद्ध झाली. पण कुठेही बडेजाव नाही. साधेपणा काहीतरी समाजाचे देणे लागतो ही भूमिकाच त्यांना रास्त वाटल्याचे जाणवते. यातील एक भाग म्हणजे धर्म'. अशा जटील विषयांविषयी रा. ना. चव्हाण यांनी साध्या सोप्या भाषेत धर्माविषयी आपले विचार मांडले आहेत तेच मी आपल्यासमोर मांडते.

भारत हा देश प्राचीन काळापासून अध्यात्म व धर्मप्रधान म्हणून जगभर ओळखला जातो. भारतीय धर्माधिष्ठित समाजरचनेतदेखील प्रत्येकाला धर्मस्वातंत्र्य व प्रचार स्वातंत्र्य आहे, असे चव्हाण यांचे मत होते. धर्मनिरपेक्षता, सत्य, अहिंसा व स्वातंत्र्य यांच्या विरोधात नाही. त्यात नीतिविहीनता अभिप्रेत नाही तर त्यात नीतिनिष्ठ विवेकवाद महत्त्वाचा मानला. धर्मनिरपेक्ष असणे आधुनिक लोकशाहीने मान्य केलेला विवेक आहे. समाजात असणारी विषमता भूषणावह नाही आणि लोकशाही व्यवस्थेचा उद्देश ही विषमता दूर करणे हा आहे. अशा या नवसमाज प्रबोधनात राजकीय पक्षांनीसुद्धा हातभार लावला पाहिजे. नवसमाज प्रबोधन हे धर्मनिरपेक्ष जातिविरहित लोकशाही व समाजवादी राज्य स्थापन करण्याच्या उद्देशाने प्रवर्तित केले पाहिजे. वैश्विक मानवधर्म हे त्याचे अधिष्ठान असले पाहिजे. यात वैचारिक जागृती, न्याय आणि आचार–विचार यांचे स्वातंत्र्य यांना महत्त्वाचे स्थान असणार आहे, असे स्पष्ट मत रा.ना. चव्हाण मांडताना दिसतात.

**भारतीय संस्कृती व तिची वाटचाल**

वैदिक संस्कृती व वेदांविषयीचा पूज्यभाव प्रमाणभाव

वेदोत्तर सर्व धार्मिक ग्रंथांतून आढळतो. १८३० साली ब्राह्मोसमाजाचे स्वरुप वैदिक होते. राजा राममोहन राय यांनी 'ब्रह्म' ही वैदिक व उपनिषद आणि वेदांतवादी संज्ञा पत्करली. नंतर सर्वधर्म समन्वय व विश्वधर्म असा नवा पवित्रा घेण्यात आला. भारतीय संस्कृतीची वाटचाल प्राकृत व संस्कृत भाषा व धर्म यांच्या सहयोगाने, संमिश्रपणाने, मिलाफाने एकमेकांवर परिणाम होऊन पुढील मार्गक्रमण झालेली आहे. तुलनेने सहिष्णू व अहिंसावादी भारतीय संस्कृती होती व आहे. जैन-बुद्धांचे काही ग्रंथ नष्ट करण्यात आले. त्यांची हिंसाही झाली. मनुष्य स्वभाव पूर्वेकडे व पश्चिमेकडे थोडाफार एकसारखा आढळतो. धर्माने हट्ट व आग्रह निर्माण केले. बुद्ध, शंकराचार्य, राममोहन हे तिघे मोठे धर्मसुधारक ठरतात. या तिघांनाही भारतात संपूर्ण विजय प्राप्त झाला नाही तरी त्यांचा पूर्णपणे पराभव देखील झाला नाही. सत्य व अहिंसा या बुद्धधर्माचा ठसा म. गांधींवरही उमटलेला दिसतो.

धर्माविषयीची व्याख्या ढोबळमानाने रा. ना. चव्हाण करण्याचा प्रयत्न करतात. 'धर्माच्या पुढील वाटचालीत, मनुष्याच्या स्वभावानुसार व त्यांच्या प्रमादशीतेनुसार जी विकृती निर्माण होत असते, ती नाहीशी करून मूळधर्माचे शुद्ध व विमल स्वरूप पुनः व्यक्त करणे होय.' पुढे एके ठिकाणी असेही विचार मांडतात, 'आपल्या संस्कृतीत धर्म सर्व तऱ्हेच्या जीवनाचा पाया आहे. धर्माची, नीतीची चाड माणसाने राखली पाहिजे. धर्माची कदर आजकाल कितपत ठेवली जाईल याची शंका आहे पण धर्माची व्याख्या व्याप्त करणे जरूर आहे.' समता ही केवळ भूतदयामूलक अशी धर्माच्या विचारांच्या धर्माचा एक मुख्य दृष्टिकोण आहे, कणा आहे.

**ऐतिहासिक धर्मविषयक पार्श्वभूमी :**

ब्राह्मण धर्ममार्तंडाचा मुलाहिजा छत्रपती शिवाजी महाराजांनी राखला नाही. धार्मिकांची सत्ता नाहीशी केल्याशिवाय राजकीय स्वातंत्र्य येत नाही. धार्मिक सत्ता जगात सर्वत्रच स्वातंत्र्याच्या मार्गात आडवी येत होती व आजही येत आहे. या धार्मिक गुलामगिरीचे निर्मूलन करणे हेच महापुरुषांचे महत्कार्य होते. तथागत बुद्ध, संत तुकाराम, छ. शिवाजी महाराज, म. फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नीतिप्रधान धर्माचे पुरस्कर्ते होते. यापैकी प्रत्येकाच्या काळातील अन्याय व गुलामगिरीचे स्वरुप वेगवेगळे होते. बौद्ध परिषदा बुद्धानंतर वारंवार भरल्या व स्वतंत्र असा धर्मविचार बुद्धानंतर होत गेला. या परिषदा थांबल्यानंतर भारतात बुद्धधर्माचा विकास थांबला. तो खुंटला. धम्माचा धर्म (म्हणजे कर्मकांड) झाले. म्हणून नागार्जुनाने 'हीनयान पंथ' उपलब्ध केला. यामुळे बुद्धाच्या 'महायान' मार्गाचे अवमूल्यन झाले व शेवटी बुद्धधर्म परंपरागत हिंदू धर्माने गिळून टाकला. नागार्जुन झाल्यामुळे आद्य शंकराचार्यांचे बुद्धधर्माला गिळंकृत करण्याचे काम सुकर व सोपे झाले. डॉ. आंबेडकरांनी मूळच्या शुद्ध बुद्धधर्माचे स्वरूप पुन्हा प्रकट केले. तेच 'भीमयान'. आज समाजाला 'भीमयान' चीच आवश्यकता आहे असे मला वाटते. रा. ना. चव्हाणांच्या मते धर्माला ग्लानी आली की, धर्म विषम बनत जातो व धार्मिक गुलामगिरी निर्माण होते. धर्माच्या अशा स्वरुपात सामाजिक समता निर्माण होत नाही. सामाजिक न्याय लोपतो. बुद्ध आणि शंकराचार्य यांच्या काळात धर्मपरीक्षण, मीमांसा व समन्वय यादृष्टीने भारत जागृत होता. अध्यात्माचा विचार म्हणजे देव आहे किंवा नाही, हा वाद नव्हे. अध्यात्म ज्याच्या त्याच्यामध्ये असते. बाहेर नसते. धर्माच्या पायावर सामाजिक सुधारणा करावयाची हा फुले आंबेडकरांचा पवित्रा व उद्देश. गौतमबुद्ध ही मोठ्यातली मोठी सर्वात महत्त्वाची पहिली धर्मसुधारणा होय. बुद्धेन वर्तते इति बुद्धः! गौतमाने बुद्धियोग चालू केला व पोथीबद्धता नाहीशी केली. मायीक (मिथ्या) ईश्वर, स्वर्गकल्पना व पारलौकिकवादाची सकाम साधने दूर सारली. यज्ञयाग, योगयाग विधी व यज्ञीय पशुहत्या व तत्सम बंड (स्तोम) नाहीसे केले. भिक्षुकशाहीशी पोटावर पहिली लाथ बुद्धाने घातली, अशा स्पष्ट शब्दांत रा. ना. चव्हाण लिहितात.

रा. ना. चव्हाण या संदर्भात एक खंतही व्यक्त करतात. 'उत्तर हिंदुस्थानात मद्रास, म्हैसूर, दक्षिणेत त्रावणकोर येथे बुद्ध धर्म दीक्षेची चळवळ जाऊन भिडली नाही. हीच बाब सत्यशोधक चळवळीची. ती उत्तरेकडे गेलेली नाही याचे कारणही तेच.' पुढे ते म्हणतात, 'म. फुले व डॉ. आंबेडकर यांची हिंदीत मोठी चरित्रे झाली नाहीत, इंग्रजीत झाली आहेत. क्षत्रियांशी राजेशाही पद्धतीची राज्ये होती. त्या राज्यांच्या राजांवरही धर्मसत्ता राज्य करी. म्हणजे धर्मसत्तेची प्रतिष्ठा ही खुद्द राजसत्तेवर होती. धर्माला व धर्मगुरुला क्षत्रियांपेक्षा मानतात. पूज्यता, पावित्र्य फार मोठे समजले जाई. क्षत्रिय राजे धर्मसत्तेच्या म्हणजेच ब्राह्मण सत्तेला शरण जात. त्यांच्या पाया पडत, त्यांच्या पायाचे तीर्थ घेत. ही चाल सत्यशोधक चळवळीने मोडली होती. ब्राह्मणांना विशेष हक्क होते, सहजपणे राखीव जागा होत्या. उदा. शंकराचार्य हा ब्राह्मणातीलच होऊ शकतो. शंकराचार्य म्हणजे एक काय प्रिस्ट; असे क्षात्र जगद्गुरु वेगळा करून ही धर्मसत्ता अब्राह्मणांकडे देण्याचा प्रयत्न छ. शाहू

महाराजांनी केला हे इतिहास सांगतो.

युरोपमध्ये धर्मसत्ता व राजसत्ता यांच्यात तीव्र संघर्ष झाला. त्यातून आधुनिक सेक्युलॅरिझमचा उदय झाला. धर्मसत्तेला राजसत्तेचा पाठिंबा मिळाला म्हणून विशेषतः उत्तर पेशवाईत धर्ममार्तंड बलदंड झाले. स्वतःला श्रेष्ठ मानू लागले व त्यांनी त्यांची धर्मसत्ता वेदबंदी रक्षण करून शिवकाळापासून टिकविली. पुढे शिवाजीच्या निधर्मी धोरणाचा लोप झाला व प्रतापसिंह शेवटचे छत्रपती यांच्यावेळेस झालेले वेदोक्त प्रकरणामुळे तर मराठेशाही बुडण्यास एक धार्मिक कारण ठरले. ब्राह्मण समाज इतरांना नीच-कमी-क्षुल्लक समजत असे व त्याला अहंकार व वर्ग (ताण) याची बाधा धार्मिक व राजकीय सत्तेमुळे प्राप्त झाली होती ती नाहीशी करून ब्राह्मणेतर समाज विद्येच्याद्वारे पुढे आणणे हा सत्यशोधक समाजाचा व चळवळीचा सेक्युलर अर्थ होता. 'धर्म' हा अफू होता कामा नये. धर्म हे अमृत असते. जो धारण करितो सुखसमाधान वाढवितो. पण आज देशात धर्मांधता वाढत आहे. हिंदू-ब्राह्मण मुस्लिमांचा द्वेष करतात. आज सामाजिक विश्वास परस्परांत नाही. ज्याला त्याला वाटते आपल्या जाती-धर्माचा मंत्री अधिकारी असावा. जात्यंधता वाढत आहे त्याला धर्मांधतेचा आधार आहे. म्हणून निधर्मीपणाचा पुरस्कार केला जात आहे. असा धार्मिक विचार ऐतिहासिक अंगाने रा. ना. चव्हाण मांडताना दिसतात.

**अंधश्रद्धेविषयी धार्मिक विचार :**

आधुनिक शिक्षणप्रसारामुळे धर्मभोळेपणा नाहीसा झाला नाही. पदवीधर स्त्रिया व पुरुष धार्मिक असतात. आत्मविश्वास वाढला नाही. भोळ्या शरणागतीच्या सामाजिक चालीमुळे बुवाबाजी व बाबाबाजी वाढली आहे. बाबांनी व बुवांनी परब्रह्म परमेश्वराची जागा घेतली आहे व लोकसमाजाने ती स्वीकारली आहे. बुवा व बाबा महाराज देवऋषी ब्राह्मणेतरांतच जास्ती आहेत. तसेच हल्ली विकासाच्या आड धर्म येतात. उदा. रस्ता करावयाचा झाल्यास श्रद्धास्थळे आडवी येतात व त्यांची स्थलांतरेदेखील करता येणे अवघड होते. विज्ञानात्मक दृष्टिकोनालाही धर्म रोखतो. धर्म म्हणजे अध्यात्म व मूळ त्याचे पायाभूत तत्त्वज्ञान हे बाह्य व रूढ धर्मामुळे व कर्मकांडात्मक श्रद्धेमुळे मागे राहते व खरा परमार्थ लोपतो व धर्माचा मूलभूत उद्देश नाहीसा होतो. धर्म म्हणजे 'धम्म' नीती-सदाचार-बंधुत्व. सत्य वगैरे अतिउच्च व मनुष्याला मनुष्य करणाऱ्या बाबी दूरच राहतात.

**जातीयता व धर्मांतर**

कर्मविकोपाच्या कल्पना फार प्राचीन काळापासून होत्या म्हणून व अनेक कारणांमुळे जातिवर्ण भेदांना दैवी व नैसर्गिक समजण्याचा पायंडा पडला व तोच पिढ्यान्‌पिढ्या रूढ झाला. सुरुवातीला चार प्रमुख वर्ग होते. त्यालाच मागाहून वर्णकल्पना जोडली. प्रत्यक्ष समाजातून असंख्य उत्तरोत्तर अनेक जाती, जातिभेद, जातिमत्सर व उच्च-नीच भाव मात्र राहिला. कोणत्याच धर्मसुधारकांना जातिप्रकार संपूर्णतः मोडता आले नाहीत. बुद्ध क्षत्रिय हाच पहिल्या क्रमांकाचा वर्ण मानीत असे. त्याचवेळी वर्णाश्रम असावा. संतांनी, जैन-बुद्धांनी फक्त अध्यात्मिक व पारलौकिक समता शिकवली. व्यवसाय हे मनुष्यकृत असतात. वर्णपद्धती ही असंख्य जातींच्या निर्मितीस कारणीभूत झाली नाही. त्यापूर्वी व्यावसायिक जातींचे अनेकत्व होते. हे येथील सामाजिक इतिहासावरून सांगता येते. 'जात'हा शब्द 'ज्ञात' या शब्दाऐवजी वापरला जातो, संस्कृतीच्या व समाजाच्या वाटचालीत त्या निर्माण झाल्या. या संदर्भात रा. ना. चव्हाण म्हणतात, 'जात ही जाऊ शकते, बदलूदेखील शकते. हा ऐतिहासिक अनुभव, विश्वास व ही श्रद्धा बळावली पाहिजे तरच जातिनिर्मूलन उत्तरोत्तर होईल. 'जाति'' राहणारच! असे म्हणून निराशा, वैफल्य पसरवू नये.' असा सल्लाही देतात.

प्रत्यक्षात व्यवहारात जन्म जातीवरून स्पृश्य का अस्पृश्य गणले व ओळखले जाऊ लागले. म्हणून अस्पृश्यतेची जननी ही जन्मजातीच होय. हा सामाजिक दुसरा सिद्धांत मांडावयाचा होता. खरे तर जातिनिर्मूलन म्हणजेच अस्पृश्यता निवारण होय. व्यवसायानुरुप वंशपरंपरेनुसार स्पृश्य-अस्पृश्य वर्ग निर्माण झाला. उदा. चांभार, ढोर, ब्राह्मण इ. पुढे अस्पृश्यता मोडण्याचा सार्वजनिक व कायद्यानेही प्रयत्न मागे कधीच झाला नाही. त्याचा परिणाम म्हणजे मुसलमानांनी या रूढीचा फायदा घेतला. त्यांनी स्पृश्यता पाळलीच नाही. नंतर ख्रिस्ती मिशनऱ्यांनी त्यांच्याकडे धार्मिक स्वार्थाच्या दृष्टीने सक्रिय लक्ष दिले. संस्कृतीच्या वाटचालीत जे उपेक्षित राहिले त्यांचा परकीय आक्रमक धर्मांनी फायदा घेतला व स्थानिक (हिंदू) धर्माने या प्रकारात लक्षच घातले नाही. सगळा इतिहास हिंदू मुसलमान राजांच्या आपापसांतील कलहाचा व सत्ता संघर्षाचा झाला.

सगळे धर्म जर समान असतील तर व एकसारखे अभ्यासनीय वाटतील तर कोणत्याच प्रकारच्या धर्मांतराची भारतात जरूरी नाही. बौद्धधर्म स्वीकार हे धर्मांतर नव्हे तर हिंदू संस्कृती व धर्म याचीच शाखा आहे. भारतीय शासन हे निधर्मी असणेच क्रमप्राप्त आहे. अटळ आहे. व यानुसार घटना निधर्मी आहेच. वडिलोपार्जित धर्म पाळण्यास स्वातंत्र्य आहे. ब्राह्मणवर्गातील श्रेष्ठता अहंगंड यासाठी नाहीसा झाला पाहिजे

यावर जात म्हणजे जातिपृथकतेचे मूळ सजातीय विवाहात असते व हिंदू हा समाज बनवावयाचा झाल्यास जातिनिर्मूलनार्थ मिश्रविवाह व आंतरजातीय विवाह झाले पाहिजे असे चव्हाण सुचवितात.

अस्पृश्यता व जातीयता हिंदूधर्म टाळू शकला असता तर 'धर्मांतर' हा शब्दही उच्चारला गेला नसता. धर्मसंप्रदाय अनेक असले तरी आत्मिक व भावनिक ऐक्याकडे स्वहट्ट व अहंकार सोडल्यास सर्वांनाच जाता येईल. जातीवर्णभेद अस्पृश्यता वगैरे उच्चनीच भाव सामाजिक-आर्थिक विषमता ही लोकशाहीने अमान्य केली आहे. 'शुद्धधर्म' या माध्यमातून ती शिकवून मान्य केली जावी असेच केवळ नव्हे, तर भारतीय लोकशाही समाजवादाला व निधर्मी दृष्टीला विषमता विरुद्ध ठरते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाबाबत रा. ना. चव्हाण आपले मत मांडतात-

हिंदुस्थानच्या घटनेचे स्वरूप जातीधर्मातीत ठेविले आहे. जातीयतेविरुद्ध सरकारचा उत्तरोत्तर कटाक्ष वाढत आहे. हे चांगले आहे. अस्पृश्यतेप्रमाणे जातीयता मारण्यासाठी कायदेशीर सरकारी प्रयत्न झाल्यास जातीयता लवकरच लोप पावत जाईल. भाषावार प्रांतरचना देशीभाषांची उन्नती करील!

धर्मसुधारणेचा व धर्माधर्मांचा विवेक या देशात जागृत आहे हे सिद्ध झाले. डॉ. आंबेडकर झाले नसते तर फार मोठी पोकळीच राहिली असती व धर्मविवेक निद्रिस्थ राहिला असता. समाजप्रबोधन मागेच थांबले असते व थिटे पडले असते. पण आजही चित्र थोडेफार तसेच आहे. यावरही चव्हाण परखडपणे भाष्य करतात, ' ब्राह्मणेतरांनाच भट-भिक्षुकी हवी आहे. मंत्री वगैरेंना सरकारी कचेऱ्यांतून, वेगवेगळ्या खात्यांतून, 'गणेशोत्सव' होतो, 'सत्यनारायण' होतो. निधर्मी राज्यात पाद्यपूजन, पायाभरणी, उद्‌घाटने, इमारतीचे नूतनीकरण! ते चालते. सरकारी कामांत सरकारी खर्चाने भिक्षुकीचे स्तोम माजवले जाते. सत्ताधाऱ्यांनी सत्ता टिकवली म्हणजे झाले. परंतु भिक्षुकशाहीच निधर्मी राज्यच आस्ते-आस्ते गिळून टाकील. म्हणून आजच्या तरुणपिढीला चव्हाण सावध करताना सद्यपरिस्थितीचे दर्शनही घडवितात. 'म्हातारवयापर्यंत धर्माचा विषय व सत्कृत्ये पुढे ढकलणे अव्यवहार्य आहे. धर्म काही फक्त पेन्शनरांचा नाही. तरुण फक्त कादंबरी वाचन, ऐहिक चैन यासाठीच नाही. धर्म, संत वाङ्मय व तत्त्वज्ञान यांचा विचार तरुणांस वावडे वाटण्याचे कारण नाही. ईश्वरदेखील सर्वांचा सखा आहे. तो वयादि तत्सम बाबी पाहत नाही. कोणत्या काळात कुठल्याही ठिकाणी व कोणीही वरील चांगल्या बाबींच्या प्राप्तीसाठी प्रयत्न केले तर ते पथ्यकर आहे. धर्म ही जागतिक कल्याणाची बाब आहे. समानता, न्याय, बंधुभाव, स्वतंत्रता यावर आधारलेल्या धर्माचे उच्चाटन कम्युनिझम करू शकणार नाही. प्रपंच व धर्मसाधन या सत्य वअभेदात्मक बाबी आहेत. धर्म हा विचारस्वातंत्र्य, लोकशाही यांचा पुरस्कर्ता असतो. व्यक्तीच्या व समाजाच्याही उन्नतीस धर्म कारणीभूत होत असतो. व्यक्तिस्वातंत्र्य व व्यक्तिविकास या विरुद्ध धर्म नाही. धर्म व साधुसंतांचे शाश्वत उद्धार यांचा अवलंब करणे हे एक नैतिक सुधारणेस साह्यभूत होणारे कार्य आहे. सामाजिक सुधारणांना धार्मिक सुधारणांचा श्रेष्ठतम विचारांचा पाया व आधार पाहिजे..

अशा पद्धतीने 'धर्मविषयक विचार', राजकीय, सामाजिक, ऐतिहासिक अंगाने साध्या सोप्या भाषेत रा. ना. चव्हाण मांडतात. यात स्पष्टवक्तेपणा, परखडपणा, अभ्यासूवृत्ती, चिंतनशील दिसते. त्यांच्याच भाषेत सांगायचे म्हणजे, 'मी तो हमाल भारवाही' हा समाजोपयोगी बाणा त्यांनी कधीच सोडलेला नाही. त्यांचे विचार आजच्या काळातही अभ्यासनीय मार्गदर्शन करताना दिसतात.

**संदर्भ सूची :**


१. भारतीय संस्कृती व तिची वाटचाल- संपा. रमेश चव्हाण
२. शककर्ते ।। श्री राजा शिवछत्रपती- संपा. रमेश चव्हाण
३. सत्यशोधकाची चिंतानिका - संपा. रमेश चव्हाण
४. म. फुले यांचा शोध व बोध - संपा. रमेश चव्हाण, २२ फेब्रुवारी २०१३
५. सेवितो हा रस वाहितो आणिका भाग -१ (उदारधर्मपर लेखांचा संग्रह)- संपा. वैशाली चव्हाण
५. सेवितो हा रस वाहितो आणिका भाग -२ (उदारधर्मपर लेखांचा संग्रह)- संपा. वैशाली चव्हाण



- प्रा. निशा भंडारे
मराठी विभाग, मॉडर्न कॉलेज, पुणे
मोबा. ८८०६०३८४७५